सं.फौ.प्र.क्र. ९१६८/२०२६
शासन- वि- विपुलभाई मारिया
नि.क्र.: ४

## — न्यायनिर्णय —
## (दि. ०९.०५.२०२६)

प्रस्तुतचा खटला हा आरोपी विरूध्द कलम २८५ भारतीय न्याय संहितेचे (BNS) अंतर्गत दाखल करण्यात आला आहे.

**२.** सदर प्रकरण हे किरकोळ अपराधाच्या स्वरूपाचे असल्याने आरोपी विरूध्द कलम २२९ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता प्रमाणे नि.क्र. १ वर आदेश करून विशेष समंस काढण्यात आले होते. त्या अनुषंगाने आरोपीने नि.क्र. २ व ३ द्वारे स्वइच्छेने गुन्हा कबूल केला असून गुन्ह्याचा द्रव्यदंड रू. ३००/— या न्यायालयात पोलीस कर्मचारी मार्फत पाठविले आहे. या वरून मी असे निर्णय करीत आहे की, आरोपीने कलम २८५ भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा केला आहे.

**३.** सदर आरोपीची कृती ही स्वइच्छेने असल्याने समाधानकारक आहे. सबब आरोपीस विहित शिक्षा देण्यात येत आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपीस कलम २७५ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता अन्वये कलम २८५ भारतीय न्याय संहिता या गुन्हयाकरिता दोषी ठरविले आहे.

**२.** आरोपीकडून द्रव्यदंड रक्कम रूपये ३००/—(अक्षरी तिनशे रूपये मात्र) न्यायालयात जमा केलेला आहे. करीता प्रकरण बंद करण्यात आले.

PATIL NILESH BHASKAR

Order
Digitally signed by PATIL NILESH BHASKAR
Location: Nagpur
Date: 2026.05.09 11:48:29 +0530

**(एन. बी. पाटील)**
**न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, कोर्ट नं.३, नागपुर**
**पॅनल प्रमुख**

**दि. ०९.०५.२०२६**